Bhagirath
Gramvikas Pratishthan
F2174, Sindhudurg

जावक क्र. ०२/जून/२०२२ दिनांक - १५/०६ /२०२३

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि. प. तथा जिल्हा अभियान संचालक,
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सिंधुदुर्ग.

सस्नेह नमस्कार!

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्यरत स्वयंसहाय्यता समूहांतील महिलांना व मूर्तिकार कारागिरांना 'पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण' आमच्या भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेकडून देण्यात आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७ तालुक्यांमधील एकूण १४७ महिला (संख्या – ६६) व पुरुष (संख्या ८१) कारागिरांनी 'पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्याच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. श्री. विलास मळगावकर, श्री. मंदार पाटकर यांनी या महिला व कारागिरांना प्रशिक्षण देण्याचे काम उत्तमरीत्या पार पडले. प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व कारागिरांनी या प्रशिक्षणाचा मूर्तिकाम व्यवसायात आपल्याला उपयोग होईल व रोजगारही मिळेल अना मानस व्यक्त केला. आपल्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या यंत्रणेनेही
सदरची प्रशिक्षणे घेण्यासाठी खूप सहाय्य केले. यापुढील काळात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची मोठ्या प्रमाणात निर्मिती होऊन पर्यावरण, रोजगारविषयक समस्यांवर योग्य उत्तर आपल्याला सापडेल, असा आशावाद आम्हांला आहे. आपण या उपक्रमाला मोलाचे सहकार्य करून उपक्रम यशस्वी करण्यास हातभार लावला त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. भविष्यातही सदर प्रकल्पासाठी आपले असेच सहकार्य आम्हांला लाभावे, ही नम्र विनंती. धन्यवाद!

पत्रासोबत सदर प्रशिक्षणाचा खर्च तपशील, प्रशिक्षणाचा फोटो अहवाल, प्रशिक्षणार्थी यादी. प्रशिक्षणार्थी व उपस्थितांची नोंद प्रत इत्यादी जोडत आहोत.

आपला,

भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान करिता

अध्यक्ष

प्रसाद : 9422596500 / 7978978812
8275632401
7387891053
7978504919

मु. पो. झाराप, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन ४१६५२०.
ईमेल आयडी:- bhagirathgram@gmail.com
वेबसाइट:- www.bhagirathgram.org
Facebook:-
www.facebook.com/bhagirathgramvikas416520